क्रमांक : का.स./बैठक/१९९

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ११ डिसेंबर, २००२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ नोव्हेंबर, २००२ (सोमवार) रोजी झालेल्या १९९ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

शासनाचे मुख्य सचिव - अध्यक्ष
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर - सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे - सदस्य
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री.हरिशंकरन् - सदस्य
व्यवस्थापकीय संचालक,
स्कुलनेट इंडिया लिमिटेड,
बीजीएस अँड सन्स बिल्डींग,
१६६, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रुझ (पूर्व)
मुंबई - ४०० ०९८.

शासनाचे प्रधान सचिव - सदस्य
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

...२/-

महापालिका आयुक्त - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

शासनाचे प्रधान सचिव - सदस्य
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको, निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (पर्यावरण)
उर्जा व पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## कार्यकारी समितीच्या १९९ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १८ नोव्हेंबर , २००२ (सोमवार) |
| वेळ | : | सकाळी ११.३० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री.अजित निंबाळकर<br>शासनाचे मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| श्री.अजित वर्टी<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

निमंत्रित :

डॉ.टी. चंद्र शेखर
सह महानगर आयुक्त/
प्रकल्प संचालक,
मुंबई नागरी परिवहन प्रकल्प

श्री.प्र.ल.बोंगिरवार
अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वा.घांगुर्डे
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

माननीय मुख्य सचिव म्हणून नियुक्ती झाल्यावर श्री. अजित निंबाळकर हे प्रथमच कार्यकारी समितीचे अध्यक्ष म्हणून बैठकीस उपस्थित राहीले होते. त्यावेळी त्यांनी सर्व सदस्यांचे स्वागत केले.

श्री. हरिशंकरन्, सदस्य, कार्यकारी समिती यांनी त्यांच्या संचालक मंडळाच्या पूर्व नियोजित बैठकीसाठी बाहेरगावी जावे लागणार असल्यामुळे कार्यकारी समितीच्या बैठकीस उपस्थित राहणे शक्य होणार नाही असे कळविले असल्याचे सचिव, कार्यकारी समिती यांनी सांगितले. त्यांना अनुपस्थित राहण्यास परवानगी देण्यात आली.

त्यानंतर, कार्यसूचीवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

<u>बाब क्र.१</u> : <u>दिनांक २१ जून, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (१९८ व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

<u>बाब क्र.२</u> : <u>दिनांक २१ जून, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (१९८ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालातील खालील बाब टिप्पणीवर चर्चा झाली व निर्णय घेण्यात आला.

बाब क्र.३ : <u>प्राधिकरण/गृहनिर्माण मंडळ इत्यादी संस्था सन २००२-०३ या वित्तीय वर्षापासून प्राधिकरण आयकर कायद्याच्या नियंत्रणाखाली</u>

महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्राधिकरणाची ट्रस्ट म्हणून नोंदणी दिनांक २२ जुलै, २००२ रोजी करुन घेण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे प्राधिकरणाकडे

असलेला अतिरिक्त निधी आयकर कायद्यातील कलम ११ (५) मधील तरतुदीनुसार गुंतविणे आवश्यक आहे असेही विदित केले. प्राधिकरणाचे मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी सांगितले की, प्राधिकरणाने आयकर कायद्यातील फॉर्म १३ साठी आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता केली असल्यामुळे आयकर खात्याने प्राधिकरणास व्याजापोटी/भाडयापोटी मिळणा-या उत्पन्नातून कर सूटीचे प्रमाणपत्र (**Exemption from T.D.S.**) दिलेले आहे. तसेच शासनाचा प्रतिनिधी म्हणून प्राधिकरणाने काम पहावे, याबाबत प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांशी चर्चा करुन सल्ला घेण्यात आला आहे व हा पर्याय लवकरच प्रधान सचिव, विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्यात येईल असे सांगितले.

महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्राधिकरणाने ट्रस्ट म्हणून नोंदणी करुन घेतली आहे तसेच आयकर विभागाने प्राधिकरणास आयकरातून सवलतीचे प्रमाणपत्रही दिलेले आहे. तथापि, प्राधिकरणास आयकरातून संपूर्ण सवलत मिळेल किंवा कसे हे सर्वस्वी प्राधिकरणाचे लेखे आयकर खात्याकडून तपासल्यानंतरच ठरणार आहे. त्यामुळे प्राधिकरणाने शासनाचा प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याचा प्रस्ताव तूर्त प्रलंबित ठेवावा. त्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

बाब क्र.३ : निधी प्रवाह तक्ता (Fund Flow Statement)
सन २००२-०३ ते २००६-०७.

३.१ महानगर आयुक्त यांनी सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी लागणारा सुमारे रु.१००० कोटी इतका प्रतिभाग निधी (**Counter Part Fund**) उपलब्ध करुन देण्याची

जबाबदारी शासनाने प्राधिकरणावर टाकलेली आहे. सदरहू प्रकल्पासाठी निधी वेळेवर कसा उपलब्ध करुन देता येईल यासाठी पुढील ५ वर्षाचा निधी प्रवाह तक्ता कार्यकारी समितीच्या निदेशानुसार सादर करण्यात आलेला आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पातील रेल्वे घटकासाठी करण्यात येणारा खर्च भरुन काढण्यासाठी उपनगरीय रेल्वे प्रवाशांवर अधिभार लावण्यात येणार आहे. या अधिभाराची रक्कम महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालय यांनी घेतलेल्या कर्जाची ५०:५० या प्रमाणात परतफेड करण्यासाठी उपयोगात आणण्यात येईल. तसेच काही प्रमाणात या अधिभाराची रक्कम मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या दुस-या टप्प्याला लागणा-या भांडवली खर्चासाठी वापरण्यात येईल. प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या जागतिक बँकेच्या कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य शासनाने घेतलेली आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्राधिकरणाच्या निधीपैकी सुमारे रु.१३०० कोटी इतका निधी शासनाच्या उपक्रमात अडकलेला आहे व हा निधी प्राधिकरणास वेळेवर परत मिळत नाही. तसेच सार्वजनिक उपक्रम ठेवीवरील व्याजही वेळेवर देत नाहीत. स्थावर मालमत्तेच्या किंमतीत सतत घट होत असल्यामुळे अपेक्षित असलेले उत्पन्न जमीन विक्रीतूनही प्राधिकरणास मिळत नाही, तसेच केंद्र शासनाच्या आर्थिक धोरणांमुळे ठेवींवरील व्याजातही घट होत आहे. त्यामुळे शासकीय उपक्रमांकडे असलेल्या ठेवी व त्यावरील प्रलंबित असलेले व्याज तातडीने परत मिळणे आवश्यक आहे असे महानगर आयुक्त यांनी सांगितले. श्री.द.म.सुकथनकर, सदस्य यांनी सांगितले की, केंद्र शासनाने राज्य शासनास दिलेल्या कर्जावरही व्याजाचा दर कमी केला आहे, तसेच व्याजाच्या दरात सतत घसरण होत असल्याने शासकीय उपक्रमांकडील ठेवीवरील व्याजाच्या दरात कपात करण्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यानंतर, महानगर आयुक्तांनी अमेरिकन दूतावासाकडून वांद्रे-कुर्ला संकुलातील सुमारे ७.४ दशलक्ष हेक्टर एवढी जागा कार्यालयासाठी मिळण्याचा प्रस्ताव आला आहे असे नमूद केले. अमेरिकन दूतावासास आवश्यक असलेली जागा शासकीय उपक्रमाला प्राधिकरण ज्या दराने जागा देते, म्हणजे रु.२५००/- प्रति चौ.मी., त्या दराने जागा देण्यास तयार आहे व भाडेपट्टीचा कालावधी हा ८० वर्षाचा राहील असे त्यांना सूचविण्यात आले आहे. परंतु

अमेरिकन दूतावास शासकीय उपक्रमास लागू करण्यात आलेला दर व भाडेपट्टीचा कालावधीही मान्य नसल्याचे सांगितले व ते याबाबत वाटाघाटी करु इच्छितात असे समितीस विदीत केले.

३.३ श्री. द.म.सुकथनकर, सदस्य यांनी या संदर्भात असे सुचविले की, दिल्लीत विविध दूतावासांना जमीन देण्याच्या संदर्भातील केंद्र शासनाचे काय धोरण आहे हे तपासावे व नंतर याबाबत निर्णय घेणे योग्य होईल. महानगर आयुक्त यांनी अमेरिकन अधिका-यांबरोबर या संदर्भात वाटाघाटी करण्यासाठी एक समिती गठीत करावी असे प्रस्तावित केले व या समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे असावेत असे सूचविले :-

१. प्रधान सचिव, नगर विकास विभाग
२. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग किंवा त्यांचे प्रतिनिधी
३. श्री.जे.एस्.सहानी, सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग
४. महानगर आयुक्त

मा. अध्यक्षांनी वरील प्रस्तावास संमती दिली.

३.४ मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाकरीता निधी वेळेवर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व त्यासाठी प्राधिकरणाने योग्य ती कार्यवाही करावी असे निदेश मा.अध्यक्षांनी दिले. बाब टिप्पणीमध्ये मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी वेळेवर निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सुचविण्यात आलेल्या प्रस्तावास कार्यकारी समितीने मान्यता दिली. तसेच कार्यकारी समितीच्या सर्व सदस्यांनी निधी प्रवाह तक्त्याची नोंद घेतली.

बाब क्र.४ : <u>ठाणे महानगर पालिकेच्या परिवहन उपक्रमास (TMTU) बस आगाराचे बांधकाम व नवीन बसेस खरेदी करण्याकरीता वित्तीय सहाय्य.</u>

४.१ महानगर आयुक्त यांनी असे निवेदन केले की, ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या लेख्यामध्ये तोटा दिसत आहे. परंतु त्यांनी आधी घेतलेल्या एका कर्जाची परतफेड केली आहे व दुस-या कर्जाची परतफेड चालू आहे. ठाणे शहरातील प्रवाशांच्या वाढीची संख्या लक्षात घेता, उपक्रमाने ११० नवीन बसेस खरेदी करण्यासाठी व एक नवीन डेपोचे बांधकाम करण्यासाठी कर्ज देण्याची विनंती केलेली आहे. आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या बरोबर चर्चा झाल्याप्रमाणे कर्जाची व व्याजाची परतफेड करण्याची जबाबदारी ठाणे महानगरपालिकेने स्वीकारली आहे. एकूण रु.१५ कोटी कर्जापैकी रु.४ कोटीचे कर्ज हे नवीन बस आगाराच्या बांधकामासाठी असून त्याचे वितरण उपक्रमाने जमिनीचा ताबा व बांधकाम हाती घेतल्यानंतर कामाच्या प्रगतीनुसारच करण्यात येईल. तसेच प्राधिकरणाच्या कर्जाची रक्कम वेळेवर परत मिळण्यासाठी ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रम व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त नावाने इस्क्रो खाते **(Escrow Account)** उघडण्यात येणार आहे. तसेच कर्जासाठी इतर अटी व शर्तीही घालण्यात आलेल्या आहेत.

४.२ सदरहू प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८४८</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (राखीव निधीमधून कर्ज मंजूरी) विनियम, १९९२ च्या क्रमांक ७.१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्रमांक ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून ठाणे महानगरपालिकेच्या ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमास द.सा.द.शे. ११% दराने प्रदान - विलंब

कालावधीच्या सुविधांशिवाय व पाच वर्षामध्ये परतफेड करावयाच्या अटींवर - १०१ नवीन बसेस खरेदी करण्यासाठी तसेच नवीन आगाराचे बांधकामासह रु.१५ कोटीचे कर्ज देण्याच्या प्रस्तावास कार्यकारी समिती मान्यता देत आहे. तसेच मान्य करण्यात आलेल्या रु.१५ कोटी कर्जापैकी रु.११ कोटी कर्ज हे बस खरेदी करण्यासाठी व रु.४ कोटी कर्ज हे नवीन आगाराच्या बांधकामासाठी कामाच्या प्रगतीनुसार अदा करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील योग्य ती कार्यवाही करण्याकरीता प्राधिकरणाच्या महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.५</u> : <u>महाराष्ट्र नागरी मुलभुत सुविधा निधीसाठी शासनाच्या अंशदानाकरीता रु.२५.३५ कोटी शासनास देणे व त्याच्या अटी ठरविणे.</u>

५.१ प्रथम महानगर आयुक्त यांनी महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीचे (**MUIF**) स्वरुप सांगितले. त्यामध्ये त्यांनी मुख्यतः निधी स्थापनेची पार्श्वभूमी, निधीचे ध्येय, उद्दिष्टे, निधीतर्फे करण्यात येणारी कामे याबाबत सविस्तर माहिती दिली. निधीच्या संरचनेची माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, एमयूआयएफ चा रु.५१ कोटीचा विश्वस्त निधी (**Trust Fund**) असेल ज्यासाठी शासनातर्फे पहिल्या वर्षी रु.२५ कोटी व दुस-या वर्षी रु.२६ कोटीचे अंशदान लागेल.

५.२ महानगर आयुक्त यांनी पुढे सांगितले की, शासनाच्या सूचनेनुसार एमयूआयएफ च्या स्थापनेची सर्व कामे प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहेत. विश्वस्त कंपनी व मत्ता व्यवस्थापन कंपनी यांची स्थापना झाली असून विश्वस्त निधीची नोंदणी करण्याची प्रक्रीया पूर्ण करण्यात येत आहे. मत्ता व्यवस्थापन कंपनीमध्ये शासन व प्राधिकरण यांच्या व्यतिरिक्त सिकॉम, आयडीएफसी, आयसीआयसीआय यांचा सहभाग असेल. एमयूआयएफच्या व्यवस्थापनामध्ये सिकॉमचा पुढाकार असेल. शासनाला एमयूआयएफ मध्ये आवश्यक ते अंशदान व भागभांडवल, म्हणजे रु.२५.३५ कोटी, त्वरीत देता यावे म्हणून प्राधिकरणाच्या दिनांक १८ मार्च, २००२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ही रक्कम

प्राधिकरणाने शासनाला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे व या रक्कमेचे स्वरुप काय असावे व त्याच्या अटी काय असाव्यात यासंबंधी निर्णय घेण्यासाठी कार्यकारी समितीस प्राधिकृत केले आहे.

५.३ प्रस्तावित अटी विशद करताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, रु.२५.३५ कोटीची रक्कम शासनास ५ वर्षासाठी ठेव म्हणून देता येईल. ही रक्कम एकतर बिनव्याजी द्यावी किंवा यावर कमीत कमी व्याज आकारण्यात यावे. श्री.द.म. सुकथनकर, सदस्य यांनी पुढे असाही मुद्दा उपस्थित केला की, शासनास बिनव्याजी ठेव देणे हे एकप्रकारे अनुदान देण्यासारखे आहे. यावर महानगर आयुक्त यांनी नमूद केले की, एकूण रक्कमेपैकी रु.२५ कोटी हे विश्वस्त निधीमध्ये अंशदान असून ही रक्कम गुंतवून मिळालेल्या व्याजावर एमयूआयएफतर्फे कामे, जसे प्रकल्प तयार करणे, स्थानिक संस्थाची क्षमता वाढविणे प्रकल्पासाठी उभारलेल्या कर्जासाठी हमी देणे इ. करण्यात येणार आहेत. त्यामुळे ही रक्कम शासनास बिनव्याजी देणे आवश्यक आहे. श्री.द.म.सुकथनकर, सदस्य यांनी एमयूआयएफ च्या व्यवस्थापनामध्ये सिकॉमच्या पुढाकाराबाबत विचारणा केली व ही जबाबदारी आयएलएफएस (**ILFS**) किंवा आयडीएफसी (**IDFC**) सारख्या अनुभवी संस्थेकडे देण्याचा विचार करता आला असता, असे मत प्रदर्शित केले. याबाबतीत खुलासा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सर्व प्रथम याच संस्थांना एमयुआयएफ च्या व्यवस्थापनेची जबाबदारी घेण्याबाबत विचारण्यात आले होते. परंतु त्यांनी ही जबाबदारी स्वीकारण्यास नकार दिला, म्हणून सिकॉमची निवड करण्यात आलेली आहे.

५.४ श्री. के.एन. पटेल, विधी सल्लागार यांनी शासनाने प्राधिकरणाकडून कर्ज/ठेव घेणे कायदेशीर आहे काय, व थकबाकी असणा-या संस्थाना ठेवी अगर कर्ज देऊ नये असा कार्यकारी समितीने यापूर्वी निर्णय घेतलेला असताना सुध्दा अशी अतिरिक्त ठेव शासनास देणे योग्य आहे काय असा मुद्दा उपस्थित केला. महानगर आयुक्तांनी यावर असे सांगितले की, यापूर्वीही थकबाकी असणा-या शासकीय उपक्रमांना ठेव देण्याबाबत कार्यकारी समितीने आपला अगोदरचा निर्णय शिथिल करुनच अतिरिक्त ठेवी दिलेल्या आहेत. श्री. द.म.सुकथनकर, सदस्य यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाने ही रक्कम शासनामार्फत न देता थेट एमयूआयएफलाच द्यावी. यावर महानगर आयुक्त, यांनी मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ (अ) मध्ये योग्य ती सुधारणा झाल्याशिवाय ही रक्कम थेट एमयूआयएफच्या विश्वस्त निधीमध्ये देता येणार नाही असे सांगितले.

मा. अध्यक्षांनी सदरहू निधी कायद्याच्या तरतुदीनुसार देण्यात यावा असे निदेश दिले. याबाबतीत चर्चेअंती कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८४९ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, रु.२५.३५ कोटीची रक्कम प्राधिकरणाने शासनास बिनव्याजी, बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.६ मधील नमूद केलेल्या अटी व शर्तींना अधिन राहून, देण्यास तत्वतः मान्यता दिली. तसेच शासनास ठेव/कर्ज/अनुदान देण्यापूर्वी कायदेशीर सर्व बाबी तपासून निधी योग्य त्या स्वरुपात एमयूआयएफसाठी शासनामार्फत अथवा थेट उपलब्ध करुन दयावा."

बाब क्र.६ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) अंतर्गत बांधण्यात आलेल्या संक्रमण सदनिका आणि कायमस्वरुपी सदनिकांच्या वीजेच्या शुल्काच्या थकबाकीची रक्कम अदा करणेबाबत.

६.१ महानगर आयुक्त यांनी समितीस एमयुटीपी अंतर्गत करण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची माहिती दिली. सदरील पुनर्वसन उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन क्र.१७९१/९८ मध्ये दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने करण्यात आले असून प्रत्येक कायमस्वरुपी किंवा तात्पुरत्या सदनिकेमध्ये स्वतंत्र वीज मीटर बसविणे वेळेच्या अभावी शक्य झाले नसल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. परिणामतः सामुहिक वीज मीटर बसवून प्रकल्पग्रस्तांना वीज पुरविण्यात आली. महानगर आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, सामुहिक वीज मीटर बसविल्यामुळे व युनिटचे एकत्रीकरण झाल्याने वीज पुरवठा करणा-या संस्थांनी उच्चस्तर शुल्क आकारलेले आहे. वस्तुतः प्रकल्पग्रस्तांनी सरासरी सुमारे १०० युनीट वीजेचा वापर केला असल्यामुळे वापरलेल्या वीजेस लागू असलेल्या दराने म्हणजेच कनिष्ठस्तर शुल्काच्या दराने देयकाचा भरणा करण्यास तयार आहेत. प्रकल्पग्रस्तांचे व त्यांच्या पुनर्वसनाचे काम करणा-या सेवाभावी संस्थेचे असे म्हणणे आहे की, उच्चस्तर शुल्क व कनिष्ठस्तर शुल्क या मधील तफावतीची रक्कम मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने भरावी. मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने वेळेअभावी स्वतंत्र वीज मीटर बसवून न दिल्यामुळेच उच्चस्तर शुल्क आकारले जात आहे.

त्यामुळे फरकाची रक्कम प्राधिकरणाने भरावी. तसेच सर्व सदनिकांना यापुढे स्वतंत्र वीज मीटर बसविणेही आवश्यक आहे असे महानगर आयुक्त यांनी नमूद केले.

६.२ सह महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक, एमयुटीपी यांनी समितीच्या असेही निदर्शनास आणून दिले की, स्पार्क या सेवाभावी संस्थेने प्रकल्पग्रस्तांच्या देयकाचा भाग म्हणून रु.८५ लक्ष यापूर्वीच भरले आहेत. उच्चस्तर व कनिष्ठस्तरातील फरकापोटी माहे ऑगस्ट, २००२ अखेर भरावयाच्या एकूण रु.२ कोटी ९५ लक्ष रकमेपैकी मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने रु.३९,५४,४१०/- भरले असून अद्याप सुमारे रु.२ कोटी ५६ लक्ष इतकी रक्कम भरणे बाकी आहे. प्रकल्प संचालकांनी पुढे समितीस अशीही विनंती केली की, फरकाची रक्कम मोठया प्रमाणात असल्यामुळे मा.अध्यक्षांनी याबाबत वीज पुरवठा करणा-या संस्थांची बैठक बोलावून त्यांना कनिष्ठस्तर शुल्काने देयके तयार करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात, त्यास मा. अध्यक्षांनी मान्यता दिली. तसेच यापूर्वी मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने भरलेल्या रु.३९,५४,४१०/- एवढया रक्कमेस कार्योत्तर मंजूरी द्यावी व सर्व संक्रमण सदनिकांमध्ये स्वतंत्र वीज मीटर बसविण्यास मान्यता दयावी, अशी समितीस विनंती केली. चर्चेनंतर त्यास मान्यता देण्यात आली.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८५०</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाच्या सन २००२-०३ सालच्या अर्थसंकल्पामध्ये मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या तरतुदीमधून कायम स्वरुपी इमारतीमधील प्रकल्पग्रस्तांच्या वीज बिलाच्या फरकाच्या थकबाकीपोटी प्राधिकरणाने भरलेल्या रक्कम रु.३९,५४,४१०/- इतक्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच मानखुर्द, तुर्भे मंडाले व वडाळा येथील संक्रमण सदनिका दीर्घ कालावधीसाठी वापरल्या जातील असे गृहीत धरुन या सदनिकांमध्ये स्वतंत्र वीज मीटर बसविण्यास मान्यता देण्यात येत आहे."

बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या महत्वपूर्ण दस्तऐवजांचे अंकीय स्वरुपात रुपांतर करणे.

सुरुवातीस महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्राधिकरणाचा महत्वपूर्ण दस्तऐवज सुरक्षित ठेवणे व आवश्यक तेव्हा ते तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टिने त्यांचे अंकीय स्वरुपात रुपांतर करणे आवश्यक आहे. महत्वपूर्ण दस्तऐवज संगणकाद्वारे जतन करुन ठेवण्याशिवाय पर्याय नसल्याचे मत व्यक्त करुन कार्यकारी समितीने मे. सीएमसी कंपनी लि. या कंपनीला या कामासाठी नियुक्त करण्यास मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८५१ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ (३) (iii) व याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या महत्वाच्या दस्तऐवजांच्या १,००,००० पानांचे अंकीय रुपांतर करुन त्याचे निर्देशांकन करण्याचे काम तसेच त्यासाठी लागणारे सॉफ्टवेअर उपलब्ध करुन देण्याचे काम सीएमसी लि. या कंपनीला रु.३,६०,६६८/- या किंमतीस प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ (३) (iii) व कलम ७ (५) च्या आधारे प्राप्त होणा-या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास त्याचप्रमाणे १,००,००० पृष्ठांचे अंकीय रुपांतर करण्यात आले तर अतिरिक्त पृष्ठांसाठी बाब टिप्पणीच्या परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेल्या कागदाच्या आकारानुसार निश्चित केलेल्या दराप्रमाणे रक्कम अदा करण्यात महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ :** **आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र आणि पश्चिम द्रुतगती महामार्ग यांना जोडणारा रस्ता - मुंबई विद्यापीठाच्या मालकीची कालिना येथील काही जमीन घेणेबाबत.**

प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांनी सांगितले की, मुंबई विद्यापीठास जमिनीच्या किंमतीपोटी सुमारे रु.२ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. सदरहू रक्कम लेखा वर्ग करण्याकरीता बाब टिप्पणीमध्ये दोन पर्याय सादर करण्यात आले आहेत.

पर्याय १ :- मुंबई विद्यापीठास जमीन प्रदान करणा-या सनदेतील कलम ५ प्रमाणे सार्वजनिक रस्त्यासाठी लागणारी जमीन विद्यापीठाकडून परत घेऊन ती प्राधिकरणास देण्याची याच कलमानुसार विद्यापीठास देय असणारी रक्कम ठरविण्याची विनंती शासनास करणे व त्यानंतर रु.२ कोटींपैकी अतिरिक्त ठरणारी रक्कम विद्यापीठाकडून परत मिळविणे.

पर्याय २ :- पर्याय १ प्रमाणे अतिरिक्त ठरणारी रक्कम ही विद्यापीठास दिलेले अनुदान म्हणून गृहित धरणे.

श्री. द.म.सुकथनकर, सदस्य यांनी सनद ही वैध दस्तऐवज आहेत का ? तसेच प्राधिकरण मुंबई विद्यापीठास अनुदान अधिनियमातील तरतुदीनुसार देवू शकते का ? अशी विचारणा केली. प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी सनद हे कायदेशीर दस्तऐवज आहेत. तसेच मुंबई विद्यापीठास प्राधिकरण अनुदान देवू शकते असे अभिप्राय दिले. सदरहू प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाल्यावर अध्यक्षांनी विद्यापीठास जमिनीची किंमत वगळता उर्वरीत रक्कम अनुदान म्हणून दयावी असे निदेश दिले.

त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८५२** :

"असा ठराव करण्यात येत आहे की, आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र आणि पश्चिम द्रुतगती महामार्ग यांना जोडणा-या रस्त्यासाठी आवश्यक असणा-या मुंबई विद्यापीठाच्या कालिना येथील

जमिनीसाठी विद्यापीठास देण्यात आलेली रक्कम रु.२ कोटी (जमिनीच्या किंमतीसह) अनुदान म्हणून देण्याची शिफारस प्राधिकरणाकडे करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.९</u> : <u>गिरगांव चौपाटी ते नरिमन पॉईन्ट दरम्यानच्या समुद्र भिंतीच्या भाग क्र.२, ३ व ४ च्या (००.०० ते २८०० मीटर) मजबूतीकरणासाठी निधी उपलब्ध करणे.</u>

९.१ अतिरिक्त महानगर आयुक्त (अभि.) यांनी नरिमन पॉईंट ते गिरगाव चौपाटी पर्यंतच्या समुद्र भिंतीच्या उर्वरित कामाकरीता सुमारे रु.२०.५२ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे असे सांगितले. त्यापैकी नरिमन पॉईंट ते ओबेरॉय हॉटेल पर्यंतचे भिंतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. त्यासाठी प्राधिकरणाने या अगोदर अनुदान म्हणून रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागास दिलेली आहे. सदरहू प्रकल्पाचा विस्तृत अभ्यास व **CWPRS** यांनी केलेल्या अहवालाची तपासणी करण्यात आली आहे. सदरहू प्रकल्पासाठी होणारा खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी ५०:५० या प्रमाणात करावयाचा आहे. तसेच वरळी येथील समुद्र काठाच्या भिंतीचीही दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी सांगितले. यासाठी सुमारे रु.२.०० कोटी खर्च अपेक्षित आहे व हे कामही तातडीने करणे आवश्यक आहे.

९.२ अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांनी अशी विनंती केली की, कर्जावरील व्याजाचा दर प्रति साल १३% पेक्षा कमी करण्यात यावा. यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सदर प्रकल्पासाठी ठरल्याप्रमाणे ५०% निधी प्रत्येकी महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी उपलब्ध करावयाचा आहे व प्राधिकरण महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारे कर्ज देऊ इच्छित नाही. त्यामुळे व्याजदर कमी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. सदर निधी महापालिकेने स्वतःच उपलब्ध करावा.

वरील चर्चेनुसार खालील ठराव मंजूर करण्यात आला :-

<u>ठराव क्र.८५३</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, कार्यकारी समिती या ठरावाद्वारे प्राधिकरणास शिफारस करीत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१ (अ) अन्वये समुद्र भिंतीच्या भाग-२, ३ व ४ च्या बळकटीकरणाच्या कामाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रशासकीय मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकात नमूद केलेल्या एकूण रु.२०,५२,४८,०००/- खर्चाची नोंद घेण्यात आली. तसेच वरळी येथील समुद्र काठाच्या भिंतीची दुरुस्ती करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत ठेवावा.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, समुद्र भिंतीच्या भाग-२, ३ व ४ च्या बळकटीकरणाच्या कामाचे संदर्भातील शासनाच्या दिनांक २४.४.१९९८ च्या आदेशानुसार वरील कामाचा खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी ५०:५० या प्रमाणात करावयाचा आहे. सबब शासनाच्या आदेशानुसार वरील कामावर होणा-या खर्चाची ५०% रक्कम म्हणजे रु.१०,२६,२४,०००/- ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुपूर्द करावयाची आहे. सदरची रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे त्यांच्या मागणीनुसार व कामाच्या प्रगतीनुसार हप्त्याने वितरित करावयास मान्यता देण्यात येत आहे. प्रथमतः मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वरील कामावर होणारा ५०% खर्च म्हणजेच सुमारे रु.१०.२६ कोटी इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करावा.

"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, समुद्र भिंतीच्या भाग २,३ व ४ च्या बळकटीकरणाच्या वरील कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागणीनुसार व कामाच्या प्रगतीनुसार हप्त्याने निधी उपलब्ध करुन देण्यासाठी व त्याची पध्दत ठरविण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना देण्यात येत आहेत. तसेच कामासंबंधीत इतर तपशील ठरविण्याचेही अधिकार महानगर आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेला वरील कामासाठी कर्ज उपलब्ध करुन देणार नाही. तेव्हा बृहन्मुंबई महानगरपालिकेने आवश्यक त्या निधीची स्वतःच तरतूद करावी."

**<u>बाब क्र.१०</u> : <u>मिरा-भाईंदर महानगरपालिकेला भाईंदर येथील उड्डाणपूल बांधण्यासाठी राखीव निधीतुन मंजूर केलेल्या कर्जावरील वित्तीय वचनबध्दता भारातून (कमिटमेंट चार्जेस) सूट मिळण्याबाबत.</u>**

१०.१ महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणले की, कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेला रेल्वेवरील उड्डाणपूलाच्या बांधकामासाठी रु.१२ कोटी इतके कर्ज मान्य करण्यात आले होते. त्यापैकी एकूण रु.३ कोटी १८ लाख कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे.

१०.२ महानगरपालिकेने कामासाठी नेमलेल्या ठेकेदाराबरोबर काही वाद निर्माण झाले, इतर काही कारणांमुळे कामांची प्रगती अपेक्षेप्रमाणे झाली नाही व त्यामुळे महानगरपालिकेने कर्जाच्या हप्त्याची मागणी केली नाही. करारनाम्याची अट क्र.४.१ प्रमाणे वेळेवर कर्ज न घेतल्यास दरसाल १% प्रमाणे वित्तीय वचनबध्दता भार (कमिटमेंट चार्ज) देय होतो. त्याप्रमाणे आतापर्यंत रु.६४,३४,८६१/- इतकी रक्कम देय आहे. परंतु महानगरपालिकेने सदर भार माफ करण्याची विनंती केली आहे.

१०.३ कार्यकारी समितीने कर्ज घेण्यात झालेल्या विलंबाच्या कारणांचा सखोल विचार करुन व त्याच बरोबर कर्ज देण्याच्या प्रक्रियेमध्ये वित्तीय शिस्त असणेही आवश्यक आहे असे ठरविले. त्यामुळे आतापर्यंत देय असलेल्या भाराच्या रक्कमेपैकी ९०% रक्कम माफ करण्यात येऊन फक्त १०% रक्कम वसूल करण्यात यावी असे ठरले.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८५४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (राखीव निधी कर्ज मंजूरी) विनियम, १९९२ च्या नियम क्रमांक ७.१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन व अटींच्या अधीन राहून मिरा-भाईंदर महानगरपालिकेने द्यावयाच्या रु.६४,३४,८६१/- इतका वित्तीय वचनबध्दता भारापैकी (कमिटमेंट चार्ज) ९०% रक्कम माफ करण्यात येत आहे. वित्तीय वचनबध्दतेच्या भाराची १०% रक्कम पुढील कर्जाचे हप्ते वितरीत करताना वसूल करण्यात यावी. पुढील कामाच्या प्रगतीनुसार करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे सर्व अटी व शर्तीनुसार काम पूर्ण करावे व कर्जाची परतफेड करावी. यापुढे मात्र कर्जाचे वितरण व वसुली करारनाम्यात ठरलेल्या अटी व शर्तीनुसारच करण्यात येईल व तसे मिरा-भाईंदर महानगरपालिकेस कळविण्यात यावे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, याबाबत कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत."

बाब क्र.११ : मुंबई नागरी विकास प्रकल्प- फिरता निधी अंतर्गत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेला एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ योजनेस कर्ज सहाय्य.

या बाबीवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र.१२ : शासकीय उपक्रमामधील अतिरिक्त निधी गुंतविण्याबाबत शासन निर्णय दिनांक ६.८.२००२ नुसार सुधारीत मार्गदर्शक तत्वे.

१२.१ मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी सांगितले की, प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी हा दिनांक ६ ऑक्टोबर, १९९५ व दिनांक १० ऑक्टोबर, १९९६ च्या शासन निर्णयांनुसार

वित्तीय संस्था, अनुसूचित बँक (Scheduled Bank), राष्ट्रीयकृत बँका व सार्वजनिक उपक्रमांमध्ये गुंतविण्यात येत होता. परंतु शासन निर्णय दिनांक ६ ऑगस्ट, २००२ नुसार सार्वजनिक उपक्रमांकडे असलेला अतिरिक्त निधी हा केवळ राष्ट्रीयकृत बँकेत, राजकोष पत्र (ट्रेझरी बिल) व केंद्र शासनाच्या सिक्युरिटीजमध्ये गुंतविण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. तसेच सुधारित आदेशांनुसार सार्वजनिक उपक्रमांमध्ये निधी गुंतविताना सदर उपक्रम हा नफ्यामध्ये असणे आवश्यक आहे असे बंधन आहे. सिकॉमच्या आंतरमहामंडळ (Inter Corporate) ठेवींना परवानगी देण्यात आली आहे. परंतु अशा ठेवी सिकॉमच्या प्रमाणित (कर्ज) मत्ता (Standard (Loan) Assets ) याद्वारे सुरक्षित असणे आवश्यक आहे असे शासन निर्णयात नमूद केले आहे. यापूर्वी शासनाने गुंतवणूकीसाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांस कार्यकारी समितीने मान्यता दिलेली होती असेही मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी सादर केले. तसेच यापुढे प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी शासन निर्णयानुसार गुंतविणे आवश्यक आहे व गुंतवणूकीबाबतचा अहवालही कार्यकारी समितीस वेळोवेळी सादर करण्यात येईल असे विदित केले.

१२.२ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य यांनी सांगितले की, प्राधिकरणाची स्थापना स्वतंत्र कायद्याखाली झाली आहे व सार्वजनिक उपक्रमांसाठी निर्गमित केलेला शासन निर्णय हा प्राधिकरणास लागू होत नाही. तसेच राष्ट्रीयकृत बँकांपेक्षा वित्तीय संस्था व अनुसूचित बँकांचा व्याजाचा दर जास्त असल्यामुळे प्राधिकरणाने पूर्वीप्रमाणेच वित्तीय संस्था, अनुसूचित बँका व राष्ट्रीयकृत बँका यांच्याकडे निधी गुंतवावा असे त्यांनी सांगितले. विधी सल्लागार यांनी सांगितले की, प्राधिकरणाने निधी कशाप्रकारे गुंतवावा याबाबत निदेश देण्याचा अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १८ (२) खाली शासनास आहे, परंतु त्याचबरोबर गुंतवणुकीचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ (३) (५) नुसार कार्यकारी समितीस देण्यात आलेले आहेत असे सांगितले.

१२.३ महानगर आयुक्त यांनी शासन निर्णयाद्वारे प्राधिकरणाचे वर्गीकरण सार्वजनिक उपक्रमांतर्गत करण्यात आलेले आहे असे स्पष्ट केले. तसेच प्राधिकरणास सार्वजनिक उपक्रमांच्या यादीतून वगळण्यात यावे असा प्रस्ताव या अगोदर शासनास पाठविण्यात आला होता. परंतु सदरहू प्रस्ताव

शासनाने मान्य केलेला नाही. त्यामुळे प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी शासन निर्णयाप्रमाणे गुंतविणे बंधनकारक आहे असेही स्पष्ट केले.

१२.४ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष यांनी शासन निर्णयातील गुंतवणूकीच्या मार्गदर्शक तत्वांचा सखोल आढावा घेतला व सुधारीत शासन निर्णयाप्रमाणे राष्ट्रीयकृत बँका/राजकोष पत्र/ केंद्र शासनाचे सिक्युरिटीजमध्ये निधी गुंतवावा असे निदेश दिले. तसेच राष्ट्रीयकृत बँका ठेवीवर कमी दराने व्याज देत असल्याने व त्यामुळे प्राधिकरणास व्याजातून कमी उत्पन्न मिळत असल्यामुळे प्राधिकरणाने काही मर्यादेपर्यंत निधी वित्तीय संस्था/अनुसूचित बँकांमध्ये गुंतविणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पुनर्विचारासाठी पाठवावा असे निदेश दिले.

<u>बाब क्र.१३ :</u> <u>महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांच्याकडील ठेवीवर आकारण्यात आलेल्या २% अतिरीक्त व्याजाचा पुनर्विचार करण्याबाबत.</u>

१३.१ महानगर आयुक्त यांनी सांगितले की, शासकीय उपक्रमांकडे प्राधिकरणाचा सुमारे रु.१३०० कोटी इतका निधी अडकून पडला आहे, त्या संस्था ठेवीची परतफेड वेळेवर करीत नाहीत तसेच ठेवीवरील व्याजही वेळेवर देत नाहीत. संबंधीत संस्थांकडे व्याजापोटी (मार्च, २००२ अखेर) सुमारे रु.४५० कोटी इतकी रक्कम प्रलंबित आहे. शासकीय उपक्रम ठेवींची रक्कम वेळेवर देत नसल्यामुळे कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार २% अतिरिक्त व्याजही आकारण्यात आलेले आहे.

१३.२ त्यानंतर, महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, शासकीय उपक्रमांकडे पूर्वी ठेवलेल्या ठेवींवरील व्याजाचा दर १०% पासून १७% इतका आहे. गेल्या काही वर्षात व्याजाच्या दरात सतत घट होत असल्यामुळे शासकीय उपक्रमांकडून व्याज दर कमी करण्याबाबत वारंवार विनंती करण्यात येत आहे. शासकीय उपक्रमांकडील जादा दराने दिलेल्या ठेवींवरील व्याजाचा दर कमी करण्याचा प्रस्ताव काही अटी व शर्तींच्या अधीन राहून सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावावर सखोल चर्चा झाल्यानंतर समितीने प्रस्तावास तत्वतः मान्यता दर्शविली. तसेच शासन/शासकीय उपक्रमांकडील

ठेवींवरील व्याजाचा दर कमी करण्याचे ठरले व पुढीलप्रमाणे निदेश दिले :-

अ) ज्या शासकीय संस्था / सार्वजनिक उपक्रम यांना माहे मार्च, २००० पूर्वी जास्त दराने ठेवीची रक्कम दिली आहे त्या ठेवीवर माहे एप्रिल, २००२ पासून ११% व्याजाचा दर आकारण्यात यावा. परंतु वरील व्याजाचा दर आकारताना संबंधित संस्थांनी खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे :-

१) शासकीय संस्था/उपक्रम यांनी त्यांच्या संबंधित विभागाचे सचिव यांच्या संमतीने ठेवीच्या परतफेडीची वेळापत्रक एका महिन्यात प्राधिकरणास सादर करावे.

२) संबंधित संस्थांनी पूर्वीची ठेव व त्यावरील व्याज परत केल्याशिवाय नवीन ठेवीची मागणी करु नये.

३) संबंधित संस्थांकडे असलेल्या ठेवीचे नुतनीकरण फक्त एक वर्षासाठी करण्यात यावे त्या कालावधीत संबंधीत संस्थांनी येणे असलेली संपूर्ण रक्कम प्राधिकरणास अदा करावी. ठेवीचे नुतनीकरण होणार असल्यामुळे २% दंडनीय व्याज आकारण्यात येऊ नये.

४) ज्या संस्थांकडे प्राधिकरणाच्या ठेवी आहेत, त्यांनी प्राधिकरणाची ठेव वेळापत्रकाप्रमाणे परत करण्यात येईल यासाठी बँकेची हमी, निलंब लेखा खाते **(Escrow Account)** किंवा उत्तर दिनांकीत धनादेश **(Post dated cheques)** प्राधिकरणास अगोदर सादर करावेत.

ब) ज्या संस्थांनी, उदा.महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ इत्यादी, या अगोदर २% दंडनीय व्याज भरले असेल ते माफ करण्यात यावे किंवा येणे असलेल्या व्याजामधून ही दंडनीय व्याजाची रक्कम वळती करण्यात यावी. वन विकास महामंडळास मुदतपूर्वी ठेव परत केल्याने आकारण्यात आलेले १% दंडनीय व्याज माफ करण्यात यावे.

क) सिडको या संस्थेने मार्च, २००२ पासून दरमहा रु.७.५० कोटी या प्रमाणे परत केलेली ६०.०० कोटीची रक्कम, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ यांनी परत केलेली रु.१.२० कोटीची रक्कम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी परत केलेली रु.२.०१ कोटी रक्कम

प्राधिकरणाचे सन २००१-०२ चे लेखे वेळेवर पूर्ण करावयाचे असल्यामुळे व्याजापोटी समायोजित करण्यात आलेली आहे.

बाब क्र.१४ : मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या ५० द.ल.लिटर पाणी पुरवठा योजनेस उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मिळणेबाबत

१४.१ प्रमुख, नियोजन विभाग यांनी मिरा-भाईंदर महानगरपलिकेच्या ५० द.ल.लिटर पाणी पुरवठा योजनेस उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे स्पष्टीकरण दिले. तसेच या योजनेत प्रस्तावित केलेली रु.३.१० कोटी इतक्या खर्चाची अतिरिक्त कामेही मंजूर कर्जातूनच हाती घेण्यात येतील व या योजनेचा अतिरिक्त कामासह एकूण खर्च हा सुध्दा अंदाजित खर्चाच्या सीमेत राहील असे सांगितले. चर्चेनंतर, कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८५५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये प्राधिकरणाने ठराव क्र.४२२, दिनांक ३१ मार्च, १९९० द्वारे कार्यकारी समितीस हक्क प्रदान केले असून त्याद्वारे कार्यकारी समिती मिरा-भाईंदर महानगरपलिकेची ५० द.ल.लि. मिरा-भाईंदर पाणी पुरवठा योजना पूर्ण करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला व महानगरपलिकेला दिनांक ३१ डिसेंबर, २००३ पर्यंतच्या मुदत वाढीचा प्रस्ताव मान्य करुन कर्ज मुदतीला ३१ डिसेंबर, २००३ पर्यंत या बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र. ७ व ८ प्रमाणे शिल्लक राहिलेली व अतिरिक्त सलग्न कामे रु.३.१० कोटीची पूर्ण करण्यासाठी त्याच अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, ठरावाची अंमलबजावणी करुन प्रकल्प वेळीच पूर्ण करणे व कर्जाच्या अटी व शर्तीची पूर्तता करुन आगाऊ कर्ज सहाय्य देण्याच्या पुढील कार्यवाही करणेसाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१५ : पनवेल नगरपरिषदेच्या देहरंग पाणी पुरवठा योजनेस उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मिळणेबाबत.

१५.१ प्रमुख, नियोजन विभाग यांनी नमूद केले की, पनवेल नगरपरिषदेने देहरंग पाणी पुरवठा योजनेस उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली आहे व त्याबाबतची माहिती सांगितली. प्रस्तावावर टिप्पणी करताना महानगर आयुक्त म्हणाले की, योजनेस मुदतवाढ देता येईल पण पनवेल नगरपरिषदेने एस्क्रो खात्यात भरावयाची प्रलंबित रक्कम भरल्यानंतरच योजनेसाठी कर्ज वितरीत करण्यात यावे. यावर सदस्यांनी सहमती व्यक्त करुन कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८५६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये प्राधिकरणाने ठराव क्र. ४२२, दिनांक ३१ मार्च, १९९० द्वारे कार्यकारी समितीस हक्क प्रदान केले असून त्याद्वारे कार्यकारी समिती पनवेल नगरपरिषदेला पनवेल पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी याद्वारे दिनांक १४/८/२००३ पर्यंत मुदत वाढविण्यास व विलंबावधि अधिक सहा महिन्याने म्हणजेच दिनांक १४/४/२००२ ते दिनांक १४/१०/२००२ पर्यंत वाढविण्यास त्याच अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, ठरावाची अंमलबजावणी करुन प्रकल्प वेळीच पूर्ण करणे व कर्जाच्या अटी व शर्तीची पूर्तता करुन कर्ज सहाय्य देण्याच्या पुढील कार्यवाही करणेसाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१६ :** **वडाळा भारवाहक तळ येथे बांधलेल्या सुलभ टाईप शौचालयाचे "पैसे भरा व वापरा" या तत्वावर परिचालन व परिरक्षण करण्यासाठी संस्थेची नेमणूक करणे.**

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८५७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३) (iii) मधील अधिकारांचा वापर करुन आणि याबाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मे.कवल सेवा संस्था यांचा वडाळा भारवाहक तळ येथील शौचालयाचे "पैसे भरा व वापरा" या तत्वावर परिचालन व परिरक्षण करण्यासाठी त्यांनी त्यांच्या निविदेमध्ये नमूद केलेला रु.१५,०२०/- या सर्वोच्च किंमतीच्या देकारास मान्यता देण्याबाबत व त्यासाठी त्यांची नेमणूक करण्याबाबत मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांच्या संमतीने केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावांच्या कार्यवाहीनंतर इतर निविदाकारांची अनामत रक्कम प्रत्येकी रु.१०,०००/- त्यांना परत करण्यास कार्यकारी समिती मान्यता देत आहे.

"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१७ :** **प्राधिकरणातील उप-अभियंता वर्ग-१ आणि वर्ग-२ व कनिष्ठ अभियंता यांच्या व्यावसायिक परीक्षा**

**(Professional Examination for Dy. Engineers Grade-I and Grade-II and Junior Engineers in MMRDA.)**

१७.१ अतिरिक्त महानगर आयुक्त (अभि.) यांनी असे सांगितले की, व्यावसायिक परीक्षेच्या अभ्यासक्रमांतील "लेखा" विषयक पेपरचा ४०% भागच फक्त प्राधिकरणाच्या कामाशी सुसंगत आहे.

त्यामुळे परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी सरासरी मार्क देण्याचा प्रस्ताव आहे. तसेच अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक यांनीही प्राधिकरणाच्या अधिका-यांसाठी लेखा विषयक स्वतंत्र पेपर तयार करण्यास नकार दिला आहे. श्री. द.म.सुकथनकर, सदस्य यांनी सांगितले की, जर लेखा विषयाचा काही भागच प्राधिकरणाच्या कामाशी सुसंगत आहे तर लेखा विषयक परीक्षेच्या पेपरच्या मार्कांची सरासरी कमी करण्यापेक्षा लेखा विषयक पेपरला बसण्याची गरज नाही व तो पेपर व्यावसायिक परीक्षेच्या अभ्यासक्रमातून काढून टाकण्यात यावा. या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. श्री. र.य.तांबे, सदस्य यांनीही असे सुचविले की, अभियांत्रिकी अधिका-यांच्या रोखण्यात आलेल्या वेतनवाढी अदा करण्यात याव्यात. सदरहू बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाली व कार्यकारी समितीने पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८५८</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ च्या उपकलम (३) (एक) व या बाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती बाब टिप्पणीत सादर केलेल्या ठरावात बदल करुन पुढील ठराव मंजूर करीत आहे :

(१) अभियंत्यांना लागू करण्यात आलेल्या व्यावसायिक परीक्षेच्या अभ्यासक्रमातून "लेखा" विषयक पेपर काढून टाकण्यात येत आहे.

(२) लेखा विषयक पेपर व्यावसायिक परीक्षेच्या अभ्यासक्रमातून काढून टाकण्यात आल्यामुळे दिनांक १८.११.२००२ रोजी म्हणजेच सदर ठराव मंजूर झालेल्या दिनांकास वयाची ४० वर्षे पूर्ण करणा-या अभियंत्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून पूर्णतः सूट देण्यात येत आहे.

(३) दिनांक १८.११.२००२ रोजी ज्या अभियंत्यांनी वयाची ४० वर्षे पूर्ण केली नसतील त्या सर्व अभियंत्यांनी व्यावसायिक परीक्षा (लेखा विषयक पेपर वगळून) तीन प्रयत्नात म्हणजेच जून, २००५ पर्यंत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. अन्यथा, त्यांच्या वार्षिक वेतनवाढी रोखण्यात याव्यात. तसेच यापूर्वी व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी

ऑक्टोबर, १९९८ पासून रोखण्यात आलेल्या सर्व अभियंत्यांच्या वार्षिक वेतनवाढी खुल्या करण्यात येत आहेत.

(४) यापूर्वी ज्या अभियंत्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक यांची व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण केली आहे ती ग्राहय ठरविण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, कार्यकारी समितीने हयापूर्वी केलेला ठराव क्र.५५४ निरसित करण्यात येत आहे. तसेच वरील सर्व निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहेत."

<u>बाब क्र.१८(अ)</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी तिमाही व्यवस्थापन अहवाल दिनांक १ जुलै, २००१ ते ३० सप्टेंबर, २००१.</u>

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी दिनांक १.७.२००१ ते दिनांक ३०.९.२००१ च्या तिमाही व्यवस्थापन अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

<u>बाब क्र.१८(ब)</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी तिमाही व्यवस्थापन अहवाल दिनांक १ ऑक्टोबर, २००१ ते ३१ डिसेंबर, २००१.</u>

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी दिनांक १.१०.२००१ ते दिनांक ३१.१२.२००१ च्या तिमाही व्यवस्थापन अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

<u>बाब क्र.१९(अ)</u> : <u>दिनांक ३०.९.२००१ रोजी संपणाऱ्या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेखे.</u>

दिनांक ३०.९.२००१ रोजी संपणाऱ्या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेख्यांची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

<u>बाब क्र.१९(च) :</u> <u>दिनांक ३१.१२.२००१ रोजी संपणा-या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेखे.</u>

दिनांक ३१.१२.२००१ रोजी संपणा-या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेख्यांची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

<u>बाब क्र.२०</u> : <u>"मुंबईची सद्यस्थिती" याबाबतच्या अभ्याससंबंधीचा प्रस्ताव</u>

या बाबीवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

<u>बाब क्र.२१</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी तिमाही व्यवस्थापन अहवाल दिनांक १ जानेवारी, २००२ ते दिनांक ३१ मार्च, २००२.</u>

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी दिनांक १.१.२००२ ते दिनांक ३१.०३.२००२ च्या तिमाही व्यवस्थापन अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

<u>बाब क्र.२२</u> : <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वेगवेगळया मिळकतींचे संरक्षणासाठी बंदूकधारी सुरक्षारक्षक ठेकेदारांची तीन वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करणेबाबत.</u>

सुरुवातीस महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्राधिकरणाच्या वेगवेगळया जमिनीचे संरक्षणासाठी सुमारे २५० बंदुकधारी सुरक्षा रक्षक नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या व आलेल्या निविदांची छाननी करुन सविस्तर प्रस्ताव कार्यकारी समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे. बैठकीत बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन

कार्यकारी समितीने पुढील प्रमाणे ठराव मंजूर केला :

<u>ठराव क्र.८५९</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३) (iii) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, (१) मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लिमिटेड, (२) मे.विशाल प्रोटेक्शन फोर्स, (३) मे.मॉर्डन व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लिमिटेड, (४) मे.सिंग सिक्युरिटी सर्व्हिसेस आणि (५) मे.सिक्युरिटी अँड पर्सोनेल सर्व्हिसेस प्रा.लिमिटेड या पाच सुरक्षा ठेकेदारांना रु.४,२००/- या दराने (दररोजचे आठ तास प्रति बंदूकधारी सुरक्षा रक्षक प्रति मास अशा सर्व समावेशक दराने) बंदुकधारी सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरविण्यास सांगण्यात येईल आणि जीप, वॉकी-टॉकी इत्यादींसाठी वेगळा आकार देण्यात येणार नाही. सदरच्या नेमणूका, नेमणूकीच्या तारखेपासून तीन वर्षासाठी असतील.

"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्तांना उपरोक्त ठरावातील सुरक्षा रक्षक ठेकेदारांना प्राधिकरणाच्या मिळकतीचे संरक्षण करण्याचा ठेका देण्यासाठी आणि देकार स्विकारण्यासाठी आणि त्या त्या वेळेच्या गरजेप्रमाणे बंदुकधारी सुरक्षा कंत्राटाचा कालावधी कमी किंवा जास्त करण्यास, आवश्यकतेनुसार सुरक्षा रक्षकांच्या संख्येत वाढ करण्यास तसेच ठरावाची अंमलबजावणी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.२३ : अनिक-वडाळा मार्ग व मुंबई पोर्ट ट्रस्ट पाईप लाईन रस्ता हयांना जोडणा-या रस्त्याचे बांधकाम करणेबाबत.

२३.१ अतिरिक्त महानगर आयुक्त (अभि.) यांनी सभासदांना बाब टिप्पणीतील विषयाची संक्षिप्त कल्पना दिली व सांगितले की, पूर्व-पश्चिम मुक्त मार्ग गेल्या कित्येक वर्षात बांधणे शक्य झाले नाही. त्यामुळे अनिक-वडाळा मार्गास महत्व आहे. परंतु बरकतअली नाका येथे रस्त्याची रुंदी अत्यंत कमी असल्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. प्रस्तावित रस्ता केल्यास अनिक-वडाळा रस्ता व मुंबई पोर्ट ट्रस्ट रस्ता जोडल्यास ट्रक वाहतुकीची समस्या कमी होण्यास मदत होईल. सदर प्रकल्प प्राधिकरणाच्या सन २००२-०३ सालच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत करण्यात आलेला आहे. त्यांनी अंदाजित रकमेच्या ५०% इतकी रक्कम मंजूर करण्यासाठी विनंती केली.

२३.२ श्री. द.म.सुकथनकर, सदस्य यांनी विचारणा केली की, पूर्ण रस्ता रुंदीसाठी भूसंपादन करुन रस्त्याचे बांधकाम त्याप्रमाणे संपूर्ण रुंदीसाठी का विचारात घेण्यात येत नाही?

त्यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, तसे केल्यास खर्चाचा बोजा दुप्पट होईल आणि मुंबई पोर्ट ट्रस्टकडे इतका निधी नसल्यामुळे कदाचित त्यांच्याकडून संपूर्ण रस्ता बांधण्यासाठी मंजूरी मिळणेसाठी त्रास होईल. त्यामुळे असे सुचविण्यात आले की, सध्या प्रस्तावित रस्ता बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे करण्यात यावा आणि उर्वरित रस्त्याचे बांधकामही करण्यासाठी प्रयत्न करावे. त्याचप्रमाणे शक्यतो सॉल्ट पॅन रोड हा वडाळा-अनिक रस्त्याच्या रुंदी इतका बांधण्यात यावा. सदर प्रस्तावास सभासदांनी संमती दर्शविली. त्याचप्रमाणे मा. मुख्य सचिवांनीही मान्य केले. त्याप्रमाणे कार्यकारी समिती पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.८६० :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा

वापर करुन कार्यकारी समिती पुढील ठराव मंजूर करीत आहे.

(१) प्रस्तावित रस्त्याचे प्राथम्य विचारात घेता, रस्त्यासाठी भू-संपादन व बांधकाम करण्याकरीता अंदाजित खर्चाच्या ५०% रक्कम म्हणजे रु.७९५ लक्ष देण्याकरीता कार्यकारी समिती मान्यता देत आहे. वरील खर्च हा वडाळा भारवाहक तळाचा भाग म्हणून समजण्यात येईल.

(२) या रस्त्याच्या बांधकामाचा तसेच भूसंपादनाचा संपूर्ण तपशिल ठरविण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

(३) वरील रस्त्यासाठी लागणारी ५०% रक्कम, जरुर लागेल तेव्हा हप्त्यांमध्ये, वितरीत करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच रस्ता पूर्ण झाल्यानंतर या रस्त्याची दुरुस्ती मुंबई पोर्ट ट्रस्टमार्फत करण्यात येईल व त्याचा तपशील ठरविण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना देण्यात येत आहे.

प्रस्तावित रस्त्याचे बांधकाम संपूर्ण रुंदी विचारात घेऊन करण्यासाठी प्रयत्न करावेत व सदर रस्त्याचे बांधकाम वडाळा-अनिक रस्त्याइतक्या रुंदीसाठी करण्यात यावे. त्याप्रमाणे मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचेकडून ना हरकत मिळविण्यासाठी त्या आशयाचे पत्र लिहून पूस्ती घेण्यात यावी. वरील प्रस्तावास पहिल्या टप्प्यात बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे रस्त्याचे बांधकाम करण्यास कार्यकारी समिती मंजूरी देत आहे. तसेच दुस-या टप्प्यात उर्वरित रुंदीच्या रस्त्याचे काम करण्यासाठी प्रयत्न करावे."

बाब क्र.२४ : विक्रांत युध्दनौकेचे सागरी वस्तुसंग्रहालयात रुपांतर करणे - विक्रांत युध्दनौकेची दुरुस्ती करण्यासाठी भारतीय नौदलास रु.१ कोटी देण्याबाबत.

या बाबीवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

<u>वाव क्र.२५</u> : <u>दिनांक ३०.६.२००२ रोजी संपणा-या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेखे.</u>

दिनांक ३०.६.२००२ रोजी संपणा-या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेख्यांची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********